| | | |
|---|---|---|
| MHYA210025932022 | दाखल दिनांक | १५/१२/२०२२ |
| | नोदंणी दिनांक | १५/१२/२०२२ |
| | निकाल दिनांक | ०७/०८/२०२६ |
| | कालावधी | ०३ **व.** ०७ **म.** २२ **दि.** |

**वणी येथील न्यायदंडाधिकारी वर्ग–१, न्यायालय क्र.२ यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी – ए. बी. बिरादार)**

**–: न्यायनिर्णय :–**

**(घोषित दि.०७/०८/२०२६)**

**नियमित फौजदारी खटला क्र.२०७/२०२२,निशाणी क्र.३५.**

**अपराध क्र.७३७/२०२२, पोलीस ठाणे– वणी,**

| | |
|---|---|
| फिर्यादी | **महाराष्ट्र शासन तर्फे,**<br>पोलीस ठाणे वणी. |
| अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता | **श्री.पी.एम.कन्नलवार** |
| आरोपी | **१. कल्पेश प्रविण पटेल,**<br>वय–४५ वर्षे, व्यवसाय– व्यापार,<br>रा.साई नगरी, वणी, ता.वणी,<br>जि.यवतमाळ,<br>**२. संतोष रमेश आयातवार,**<br>वय–४३ वर्षे, व्यवसाय– मजुरी,<br>रा.गुरुनगर, वणी, ता.वणी,<br>जि.यवतमाळ,<br>**३. विलास सुर्यभान पारखी,**<br>वय–४८ वर्षे, व्यवसाय– मजुरी,<br>रा.हनुमान मंदीरजवळ, वणी,<br>ता.वणी, जि.यवतमाळ. |
| आरोपीतर्फे विधिज्ञ | **श्री.पी.एस.दानव.** |

**भाग –ब**

| | | |
|---|---|---|
| **१.** | प्रथम खबर दिनांक | ०२/११/२०२२ |

| | | |
|---|---|---|
| **२.** | दोषारोप पत्राचा दिनांक | १२/१२/२०२२ |
| **३.** | दोषारोप ठेवल्याचा दिनांक | १५/१२/२०२२ |
| **४.** | पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०७/०२/२०२३ |
| **५.** | न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक | ०७/०८/२०२६ |
| **६.** | न्यायनिर्णयाचा दिनांक | ०७/०८/२०२६ |
| **७.** | शिक्षा दिल्याची तारीख, आदेश | निर्दोष मुक्त. |

## आरोपीचा तपशील

| अ. क्र. | आरोपींचे नाव | अटक तारीख | जामीनवर सोडल्याची तारीख | अधिनियम | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा दिली | दिलेली शिक्षा | सुणावणीदरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी कलम ४२८ सी. आर. पी. सी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कल्पेश प्रविण पटेल | निरंक | १५/१२/ २०२२ | भा.दं.वि. ३२५, ५०४, ५०६, ३४ | निर्दोष मुक्त केले. | निरंक | निरंक |
| २. | संतोष रमेश आयातवार | निरंक | १५/१२/ २०२२ | भा.दं.वि. ३२५, ५०४, ५०६, ३४ | निर्दोष मुक्त केले. | निरंक | निरंक |
| ३. | विलास सुर्यभान पारखी | निरंक | १५/१२/ २०२२ | भा.दं.वि. ३२५, ५०४, ५०६, ३४ | निर्दोष मुक्त केले. | निरंक | निरंक |

## भाग–क

## अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी / बचाव / न्यायालयाचे साक्षीदार

### अ. अभियोग

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| | | (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
| अ.सा.क्र.१ | विजय विनायक शिंदे | घटनास्थळ पंच (निशाणी क्र.३०) |
| अ.सा.क्र.२ | सतिश शंकर वऱ्हाटे | घटनास्थळ पंच (निशाणी क्र.३१) |
| अ.सा.क्र.३ | सन्नी गुनामल केशवान | फिर्यादी (निशाणी क्र.४६) |
| अ.सा.क्र.४ | गोपी राजाराम केशवानी | साक्षीदार (निशाणी क्र.४९) |

**ब. बचाव साक्षीदार, इतर**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| डि.सा.क्र.१ | निरंक | निरंक |

**क. कोर्ट साक्षीदार, इतर**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| सी.सा.क्र.१ | निरंक | निरंक |

**अभियोगपक्षाचे / बचाव / कोर्ट निशाणी**

**अ. अभियोग**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | ४७ | फिर्यादीवरील सही |
| २. | ४८ | छापील खबरवरील सही |

**ब. बचाव**

| अनु. क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**क. कोर्ट निशाणी**

| अनु. क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**ड. मुद्देमाल**

| अनु. क्र. | मुद्देमाल | तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

## –:: न्यायनिर्णय ::–
## (घोषित दि.०७/०८/२०२६)

प्रस्तुत खटला हा आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान १८६० चे कलम ३२५, ५०४, ५०६, ३४ अन्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्यासाठी चालविण्यात आला आहे.

**अभियोग पक्षाची खटल्याबाबतची कथने संक्षिप्तरित्या खालील प्रमाणे आहेः–**

**०२.** फिर्यादी सन्नी गुनामल केशवान याने पोलीस ठाणे, वणी येथे फिर्याद दिली की, दि.२५/०४/२०२२ रोजी त्याने पराग पटेल याचे दुकानातून रु.८२,०००/– मध्ये मोपेडे विकत घेतली होती. फिर्यादीने पराग पटेल याला रु.७२,०००/– दिले व उर्वरित रु.१०,०००/– त्याचेकडे बाकी होते.

**०३.** दि.०१/११/२०२२ रोजी रात्री ०८.३० वाजताचे दरम्यान त्याला पराग पटेल याचे उर्वरित रु.१०,०००/– द्यायचे होते. त्यामुळे, तो पराग पटेलचा भाऊ आरोपी क्र.१/कल्पेश याचे तृप्ती बार, वणी येथे गेला असता तो त्याच्या बारच्या

टेरिसवर बसून होता. तो तेथे गेला असता त्याठिकाणी तिन्ही आरोपीं बसुन होते. त्याने आरोपी क्र.१ ला, "मी तुझा भाऊ परागकडुन मोपेड गाडी विकत घेतली होती, त्याचे रु.१०,०००/– माझ्याकडे बाकी असल्याने ते मी १५ दिवसात देतो", असे म्हटले. त्यावर, आरोपी क्र.१ ने त्याला, "तु याहाँ पे कैसे क्या आया, और मेरे साथ कैसी बात कर रहा", असे म्हटले आणि त्याला शिवीगाळ करुन ढकलुन दिले. त्यानंतर, आरोपी क्र.२ व ३ ने त्याला पकडुन ठेवले व आरोपी क्र.१ ने त्याला हाताबुक्याने मारहाण केली. त्यानंतर, आरोपींनी त्याला ढकलुन दिल्याने तो खाली पडला. त्यामुळे, त्याच्या उजव्या हाताला मार लागुन त्याचा उजवा हात फॅक्चर झाला. तसेच, आरोपींनी त्याला, "तु जर आमच्या विरोधात रिपोर्ट दिला तर तुला खतम करुन टाकतो", अशी धमकी दिली. त्यानंतर, त्याने घटनेबाबत आरोपींविरुद्ध पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

**०४.** फिर्यादीच्या तक्रारीवरुन वणी पोलीस स्टेशन येथे अपराध क्र.७३७/२०२२ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला. गुन्ह्याचा तपास पोलीस हेड कॉन्टेबल जगदीश बोरनारे यांच्याकडे देण्यात आला. तपासादरम्यान त्यांनी पंचांना सूचनापत्र देवून घटनास्थळ पंचनामा तयार केला. फिर्यादी व साक्षीदारांचे बयाण नोंदवले. पुढील तपासादरम्यान त्यांना आरोपीविरोधात पुरेसा पुरावा मिळाल्यामुळे फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम १७३(२) प्रमाणे आरोपीविरुध्द वर नमुद गुन्ह्याप्रमाणे न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

**०५.** दि.१५/१२/२०२२ रोजी माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपींविरुद्ध नि.क्र.२५ वर भारतीय दंड विधान,१८६० चे कलम ३२५, ५०४, ५०६, ३४ अन्वये आरोपींवर दोषारोप ठेवले. दोषारोप हे आरोपींना मराठी भाषेत वाचुन आणि समजावुन सांगण्यात आले. आरोपींनी त्याच्यावरील दोषारोप नाकारले व

संपरीक्षेची मागणी केली. अभियोग पक्षाने सादर केलेल्या पुराव्यामधुन आरोपींविरोधात सबळ पुरावा अभिलेखावर आल्यामुळे, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३(१)(ब) प्रमाणे आरोपीचा जबाब नि.क्र.३२ ते ३४ वर नोंदविण्यात आला.

**०६.** उभय पक्षाच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. युक्तीवाद, अभिलेखावरील तोंडी व लेखी कागदोपत्री पुरावा लक्षात घेता, खालील मुद्दे माझ्या विचारात येतात, त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहित मी पुढील प्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय की, दि.०१/११/२०२२ रोजी रात्री ०८.३० वाजण्याच्या सुमारास तृप्ती बार, तलाव रोड, वणी, ता.वणी येथे आरोपींनी आपसी संगणमत करुन त्यांचे समान उद्देशपुर्ततेकरीता फिर्यादीला बुक्क्यांनी मारहाण करुन फिर्यादीस दुखापत केली व त्याद्वारे त्यांनी **भा.दं.वि. कलम ३२५ सह कलम ३४** अन्वये शिक्षेसपात्र गुन्हा केला हे अभियोगपक्ष सिद्ध करतो का ? | **... नकारार्थी** |
| **२.** | उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसी संगणमत करुन त्यांचे समान उद्देशपुर्ततेकरीता फिर्यादीस शिवीगाळ करुन अपमान केला आणि त्यांना प्रक्षोभित करुन सार्वजनिक शांततेचा भंग करण्याचा प्रयत्न केला व त्यांनी **भा.दं.वि. कलम ५०४ सह कलम ३४** अन्वये शिक्षेसपात्र गुन्हा केला हे अभियोगपक्ष सिद्ध करतो का ? | **... नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| ३. | उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसी संगणमत करुन त्यांचे समान उद्देशपुर्ततेकरीता फिर्यादीस फौजदारी पात्र धाकदपटशा करुन जिवे मारण्याची धमकी दिली व त्याद्वारे त्यांनी **भा.दं.वि.चे कलम ५०६ सह कलम ३४** अन्वये शिक्षेसपात्र गुन्हा केला हे अभियोगपक्ष सिद्ध करतो का ? | **... नकारार्थी** |
| ४. | काय आदेश ? | **...आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## <u>कारणमिमांसा</u>

अभियोगपक्षाने सदर प्रकरणामध्ये एकुण ०४ साक्षीदार तपासलेले आहेत. त्यानंतर, नि.क्र.०१ वर आदेशानुसार अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपींनी त्यांच्या बचावासाठी कोणताही पुरावा दाखल केलेला नाही.

**<u>मुद्दा क्र.१ ते ३ करीता</u>–**

**०७.** अभियोग पक्षाच्या कथनानुसार आरोपींनी भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२५, ५०४, ५०६, ३४ अन्वये गुन्हा केला आहे, हे अभियोग पक्षाने सिद्ध करणे गरजेचे व आवश्यक आहे. अभियोग पक्षाने आरोपींविरुद्धचा गुन्हा सिद्ध करण्यासाठी फिर्यादीसह एकुण ०४ साक्षीदारांची साक्ष नोंदविली. सदर घटनेतील मुख्य साक्षीदार हे फिर्यादी हा आहे.

**०८.** प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षास सिध्द करायचे होते की, आरोपींनी आपसी संगणमत करुन त्यांचे समान उद्देशपुर्ततेकरीता फिर्यादीला बुक्क्यांनी मारहाण

करुन दुखापत केली, फिर्यादीस शिवीगाळ करुन त्यांचा अपमान केला आणि त्यांना प्रक्षोभित करुन सार्वजनिक शांततेचा भंग करण्याचा प्रयत्न केला व फिर्यादीस फौजदारी पात्र धाकदपटशा करुन जिवे मारण्याची धमकी दिली. सदर बाबी सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने घटनेतील फिर्यादी साक्षीदार क्र.३/सन्नी केशवानी यांची साक्ष नि.क्र.४६ वर नोंदविली. त्यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, त्यांची आरोपींसोबत शाब्दीक शिवीगाळ झाली होती. याव्यतिरीक्त, काहीएक घडले नव्हते. त्यानंतर, त्यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांनी त्यातील मजकुर माहित नसून त्यांनी फिर्यादी व छापीलखबरवरील त्यांची सही अनुक्रमे नि.क्र.४७ व ४८ वर ओळखली. साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे विद्वान सहाय्यक सरकारी वकीलांनी न्यायालयाची परवानगी घेवून त्यांचा उलट तपास घेतला. त्यांनी मान्य केले आहे की, दि.२५/०४/२०२२ रोजी त्यांनी पराग रमेश पटेल यांचे दुकानातून रु.८२,०००/- मध्ये मोपेड गाडी विकत घेतली होती, त्यांच्याकडे रु.१०,०००/- देणे बाकी होते, दि.०१/११/२०२२ रोजी रात्री ०८.३० वाजता ते पराग पटेल यांचे रु.१०,०००/- देण्यासाठी त्यांचा भाउ आरोपी क्र.१/कल्पेश यांच्या त्रुप्ती बार, तलाव रोड, वणी येथे गेले होते, तिन्ही आरोपीं आरोपी क्र.१ च्या बारचे टेरेसवर बसून होते, त्यावेळी त्यांनी पराग पटेल यांचे रु.१०,०००/- देणे बाकी असलेले १५ दिवसात देतो, असे म्हटले असता आरोपी क्र.१ ने त्यांना, "तु यहॉ पर कैसे आया, असे म्हटले.

**०९.** पुढे त्यांनी नाकारले आहे की, आरोपी क्र.१ ने त्यांना "तु मेरे साथ कैसे बात कर रहॉ, असे म्हणून शिवीगाळ केली आणि ढकलून दिले, त्यावेळी आरोपी क्र.२ व ३ यांनी त्यांना पकडून ठेवले व आरोपी क्र.१ ने त्यांचे हात पकडून ठेवले, आरोपींनी

त्यांना ढकलून दिल्यामुळे ते खाली पडले, त्यामुळे त्यांच्या उजव्या हातावर मार लागून हात फ्रॅक्चर झाला, आरोपींनी त्यांना, "तु जर आमच्याविरुद्ध रिपोर्ट दिला तर, आम्ही तुला खतम करुन टाकू", अशी धमकी दिली.

**१०.** पुढे त्यांनी मान्य केले आहे की, त्यांची आरोपींसोबत चांगली ओळख आहे, त्यांचा आरोपींसोबत न्यायालयाबाहेर आपसी समझोता झाला आहे, सदर प्रकरणामध्ये आपसी तडजोड झाल्यामुळे ते आरोपींनी सांगितल्याप्रमाणे साक्ष देत आहे, सदरचे प्रकरण घडले आहे, सदरचे प्रकरण न्यायालयात सांगितल्यास तर आरोपींना शिक्षा होवू शकते, त्यांचे शिक्षण १०वी पर्यंत झाले असून त्यांना सहीचे महत्व कळते आणि ते दस्तावर वाचून सही करतात, त्यांनी मी रिपोर्टवर वाचून सही केली होती. पुढे त्यांनी नाकारले आहे की, त्यांचा शाब्दीक वाद झाला होता. शेवटी, त्यांनी रिपोर्ट वाचला नाही, हे जाणीवपूर्वक खोटे सांगत असल्याचे व आरोपींबरोबर संगणमत करुन खोटी साक्ष देत असल्याचे नाकारले आहे.

**११.** आरोपींचे वकीलांमार्फत घेण्यात उलटतपास घेण्यात आला, त्यात त्यांनी मान्य केले की, ते आरोपींसोबत न्यायालयात आले नाही, घटनेचे दिवशी फक्त तोंडातोंडी झाली होती, याव्यतिरीक्त काही झाले नव्हते, पोलीसांनी संगणकावर रिपोर्ट तयार केला, पोलीसांनी त्यांना तो रिपोर्ट वाचून दाखविला नव्हता किंवा पोलीसांनी त्यांना तो वाचु नाही दिला, पोलीसांनी त्यांना तो रिपोर्ट वाचू न दिल्यामुळे त्यांना त्यामध्ये काय लिहिले आहे, हे माहित नाही, फिर्यादवर केवळ त्यांची आहे. शेवटी त्यांनी त्यांना आरोपींसोबत सदरचे प्रकरण आपसी करुन मिटवायचे असल्याचे मान्य केले आहे.

**१२.** सा.क्र.४/साक्षीदार गोपी केशवानी यांनी कथन आहे की, ते फिर्यादीला ओळखतात व तो त्यांचा पुतण्या आहे. साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे विद्वान सहाय्यक सरकारी वकीलांनी न्यायालयाची परवानगी घेवून त्यांचा उलट तपास घेतला. त्यांनी मान्य केले आहे की, त्यांना दि.०१/११/२०२२ रोजी रात्री ११.३० वाजता फिर्यादीला कोणीतरी मारहाण केली व फिर्यादी रिपोर्ट देण्यासाठी पोलीस ठाण्यात गेला, असे माहिती झाले, त्यावरुन ते पोलीस ठाण्यात गेले, त्यावेळी फिर्यादी व आरोपींची बाचाबाची झाल्याचे फिर्यादीने त्यांना सांगितले. पुढे त्यांनी नाकारले आहे की, त्यावेळी त्यांनी फिर्यादीला उजव्या हाताला मार लागल्याचे पाहिले होते, फिर्यादीकडे पराग पटेलचे रु.१०,०००/– देणे बाकी होते म्हणून तो आरोपी क्र.१ सोबत बोलण्याकरीता गेला होता, त्यावेळी आरोपीं बारचे टेरेसवर बसून होते, त्यावेळी फिर्यादीने आरोपी क्र.१ ला रु.१०,०००/– त्याला १५ दिवसात देतो, असे म्हटले असता आरोपी क्र.१ ने फिर्यादीस शिवीगाळ करुन ढकलून दिले होते, त्यावेळी आरोपी क्र.२ व ३ यांनी फिर्यादीला पकडून ठेवले व आरोपी क्र.१ ने फिर्यादीला लाथाबुक्कयांनी मारहाण केली, त्यानंतर आरोपींनी त्याला ढकलून दिले व तो खाली पडला, त्यामुळे त्याचे उजव्या हाताला मार लागून तो जखमी झाला, त्यानंतर आरोपींनी फिर्यादीला,"आमचेविरुद्ध रिपोर्ट दिल्यास तुला खतम करुन टाकू", अशी धमकी दिली, सदरच्या बाबी फिर्यादीने त्यांना सांगितल्यानंतर फिर्यादीने पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. पोलीसांनी सदर घटनेबाबत त्यांचे बयान घेतले किंवा कसे आणि फिर्यादी व आरोपींमध्ये आपसी झाले, ह्या बाबी त्यांना माहित नसल्याचे कथन केले आहे.

**१३.** प्रकरणातील घटनास्थळ पंच सा.क्र.१/विजय शिंदे आणि सा.क्र.२/सतिष वऱ्हाटे यांनी घटनास्थळ पंचनाम्यावरील त्यांच्या सह्या ओळखून त्यातील संपुर्ण मजकुर नाकारला. सदर घटनास्थळ पंचांनी अभियोग पक्षाचे कथनास सहकार्य केले नाही. त्यामुळे, विद्वान सहाय्यक सरकारी वकीलांनी न्यायालयाची परवानगल घेवून त्यांचा उलट तपास घेतला. परंतु, ते त्यांचे कथनास कायम राहिले.

**१४.** प्रस्तुत प्रकरणामध्ये विधीज्ञांचा युक्तीवाद व अभिलेखावर आलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, यामधील फिर्यादी सा.क्र.३/सन्नी हा सदर प्रकरणातील जमखी असून तो दि.०१/११/२०२२ रोजी रात्री ८.३० वाजता तृत्पी बार, तलाव रोड, वणी येथे गेल्याचे कथन करत आहे. परंतु आरोपी व त्याच्यामध्ये किरकोळ वाद झाला होता, असे देखील कथन करीत आहे. तसेच, त्याने त्याचे पुराव्यामध्ये त्याचे व आरोपीचे तडजोड झाल्याचे कथन केले. त्यावरुन असे दिसून येते की, फिर्यादी व आरोपींमध्ये तडजोड झाल्यामुळे फिर्यादीने आरोपींविरुद्ध काहीएक कथन केले नाही. तसेच, सा.क्र.४/गोपी याचे साक्षचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, तो घटनेचेवेळी घटनास्थळी. नव्हता परंतु, तो घटनेचे नंतर पोलीस ठाण्यात गेल्याचे कथन करीत आहे. तसेच, त्याला मुळ घटनेबाबत काहीएक माहित नसल्याचे कथन करीत आहे. त्यामुळे त्याची साक्ष ऐकीव स्वरुपाची आहे. सा.क्र.१/विजय व सा.क्र.२/संतोष हे घटनास्थळ पंच असून त्यांनी सुद्धा अभियोग पक्षास कुठलेही सहकार्य केले नाही. त्यामुळे, आरोपीं व फिर्यादीमध्ये तडजोड झाली असल्यामुळे अभिलेखावरील पुरावा हा आरोपीने फिर्यादीला दि.०१/११/२०२२ रोजी मारहाण केली, याबाबत संशय निर्माण करतो.

**१५.** फौजदारी खटल्यांमध्ये आरोपींवरील आरोप हे सर्व संशयाची शक्यता गृहीत धरुन सिध्द झाले पाहिजेत, तोपर्यंत आरोपी निर्दोष आहेत हे गृहीतक मूळ तत्व आहे. परंतू प्रस्तुत खटल्यात वर नमूद केल्याप्रमाणे अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेलया फिर्यादी आणि साक्षीदारांच्या व अभिलेखावरील पुराव्याचा विचार करता, आरोपींनी फिर्यादीला शारीरिक व मानसिक त्रास दिला, शिवीगाळ केली हया बाबी सिध्द होत नाहीत. प्रस्तुत प्रकरणातील तथा–कथीत घटना ही कौटुंबिक स्वरुपाचे व चार भिंतीच्या आतमध्ये घडल्यामुळे फिर्यादी ही महत्वाची व पिडीत साक्षीदार आहे. परंतु फिर्यादीनेच तिच्या पुराव्यामध्ये घटनेबाबत कुठल्याही बाबींचा स्पष्टपणे खुलासा केलेला नसल्यामूळे आरोपींवरील आरोप हे संशयापलीकडे सिध्द होऊ शकत नाही. सबब, फिर्यादी व साक्षीदारांच्या आलेल्या अपूऱ्या पुराव्यावरुन आरोपींवरील तथा–कथीत आरोप संशयापलीकडे जावुन सिध्द होऊ शकले नाही. म्हणून मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.२ बाबत :</u>–**

**१६.** वरील मुद्दयास नकारार्थी उत्तर दिल्यामुळे आरोपीवर लावण्यात आलेल्या दोषारोपातुन त्यास निर्दोष मुक्त करण्याच्या निर्णयापर्यंत मी आलो आहे. आरोपी हा जामीनावर मुक्त असल्यामुळे फौजदारी प्रकीया संहिता कलम ४३७ (अ) प्रमाणे निकालानंतर पुढील सहा महिन्यांसाठी आरोपीस जामिनदार देणे गरजेचे आहे. सबब, मुद्दा क्र.२ करीता मी खालील आदेश पारीत करत आहे.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | आरोपींना **फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१)** प्रमाणे **भारतीय दंड विधान कलम ३२५, ५०४, ५०६, ३४** अन्वयेच्या गुन्ह्यातुन निर्दोष मुक्त |

| | |
|---|---|
| | करण्यात येते. |
| २. | आरोपींचे वैयक्तीक व जामीनदाराचे जातमुचलके रद्द करण्यात येतात. |
| ३. | **फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७(अ)** अन्वये सदर आरोपींनी **रक्कम रु.१५,०००/-** चा वैयक्तीक जातमुचलका द्यावा व सदरचा जाचमुचलका हा **फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ)** अन्वये पुढील सहा महिन्याकरीता अस्तीत्वात राहील. |
| ४. | न्यायानिर्णय हा खुल्या न्यायालयात **फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम ३५३ (१)(क)** प्रमाणे घोषीत करण्यात आला. |

BIRADAR AMOL BALAJI
Digitally signed by BIRADAR AMOL BALAJI
Date: 2026.08.07 17:05:53 +0530

**( ए. बी. बिरादार )**

दि.०७/०८/२०२६

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,वणी.
(न्यायालय क्र.२)

**Certificate**

I affirm that the contents of this PDF file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | G.J.Bhadke |
| Name of Court | : | 2nd Jt.Civil Judge Junior Division, Wani. |